# युवा टेलिस्कोपचे करीयर ओळख शिबीर

'साप्ताहिक विवेक'च्या युवा टेलिस्कोप- करीयर ओळख शिबिराचा महाराष्ट्रातील ११ वा कार्यक्रम दि. ११ जानेवारी २००८ रोजी मालवण येथील स.का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालयात संपन्न झाला. या कार्यक्रमात तृतीय वर्ष कला व वाणिज्यच्या १५० पेक्षा जास्त युवक-युवती सहभागी झाल्या होत्या.

महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. प्रा. श्रीपाद गिरसागर यांनी प्रमुख मार्गदर्शक प्रा. श्याम भुर्के यांचे स्वागत केले. त्यानंतर या करीयर ओळख शिबिराची गरज प्रतिपादित केली.

'युवा टेलिस्कोप' या कार्यक्रमाचे संयोजक प्रशांत शेलार यांनी या करीयर ओळख शिबिरामागील प्रयोजन व संकल्पना प्रथम समजावून दिली. त्यानंतर प्रा. विजय नवले यांनी आपल्या खुमासदार शैलीत आपले करीयर निश्चित करण्यासाठी कोणते निकष असावेत यासंबंधी माहिती दिली व एकदा करीयर निश्चित झाले की मात्र कठोर परिश्रम आवश्यक असतात हेही स्पष्ट केले. केवळ मुंबई, पुणे येथे राहणाऱ्यांनाच करीयर संधी उपलब्ध आहेत असे नसून खेड्यातून व सामान्य कुटुंबातून आलेल्या विद्यार्थ्यांनी असामान्य यश मिळवल्याची अनेक उदाहरणे आपणासमोर दिसतात. माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव अशी अनेक उदाहरणे देता येतील. डॉक्टर व इंजिनीअर म्हणजेच केवळ करीयर असे नसून कला व वाणिज्य शाखांमध्येही चांगल्या करीयर संधी उपलब्ध आहेत. आपण जे शिक्षण घेतो त्यातच आपण करीयर करू शकतो असे नसून घेतलेल्या शिक्षणाचा कोणताही संबंध नसलेल्या क्षेत्रातही अनेकांनी करीयर केले आहे, अशी अनेक उदाहरणे देऊन त्यांनी स्पष्ट केले.

प्रा. श्याम भुर्के यांनी, कोणत्याही गोष्टीचे अस्तित्व तिच्या लांबी, उंची व खोली या तीन गोष्टींवर अवलंबून असते. आपण आपल्या जीवनात सकारात्मक दृष्टिकोन ठेवला व प्रत्येक गोष्ट मला जमेल, मी हे करेन हा दृष्टिकोन ठेवला तर आपल्या जीवनातही ही लांबी, रुंदी व खोली वाढवून आपली ओळख बनवू शकतो. प्रत्येक चांगली गोष्ट मी जेवढी लवकर शिकेन तेवढी ती आपल्याला जीवनभर सोबत करते हा स्वानुभवही सांगितला.



कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्याम भुर्के, प्रशांत शेलार व प्रा. विजय नवले

उपस्थित सर्व युवावर्गाने या शिबिराला उत्तम प्रतिसाद दिला. लवकरच दोन दिवसांची कार्यशाळा या महाविद्यालयात घेतली जाणार आहे. मालवणमधील तरुण उद्योजक व सुप्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक संकल्प डेव्हलपर्सचे भूषण साटम हे या शिबिराचे प्रमुख प्रायोजक आणि 'साप्ताहिक विवेक'चे सिंधुदुर्ग जिल्हा प्रतिनिधी तसेच 'रत्नाकर इन्श्युरन्स कन्सल्टन्सी सर्व्हिसेस'चे रत्नाकर कोळंबकर व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकमेव पेस्ट कंट्रोल परवानाधारक 'सिद्धाई पेस्ट कंट्रोल'चे परशुराम तथा आप्पा लुडबे हे या कार्यक्रमाचे सहप्रायोजक होते. ✿✿✿